दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 66 ■ शनिवार 30 मे 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com


**सुविचार**

तुम्ही हे करू शकता यावर विश्वास ठेवा, म्हणजेच तुम्ही अर्धे अंतर पार केले आहे.






# रात्रीस खेळ चाले.. धाराशिव पालिकेकडून रात्रीच्या अंधारात गौण खनिज वाहतूक?

## तहसील पथकाकडून 3 वाहने जप्त; पालिका वादात

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव तहसील कार्यालयाच्या भरारी पथकाने गुरुवारी मध्यरात्री शाहू नगर परिसरात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात मोठी कारवाई करत दोन ट्रॅक्टर आणि एक टिप्पर जप्त केला. तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे.गुरुवारी रात्री साडेअकराच्या सुमारास सुरू झालेल्या या कारवाईत विनापरवाना मुरूम वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. मध्यरात्री साडेबाराच्या दरम्यान ही तीनही वाहने तहसील कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनचालकांकडे गौण खनिज उत्खनन किंवा वाहतुकीसंदर्भातील कोणतीही वैध परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले.**



या कारवाईनंतर शुक्रवारी सकाळी भाजपाचे काही नगरसेवक तहसील कार्यालयात दाखल झाले. जप्त करण्यात आलेली वाहने नगरपालिकेची असून ती विकासकामांसाठी वापरली जात असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, यासंदर्भातील कोणतीही अधिकृत कागदपत्रे तहसील प्रशासनासमोर सादर करण्यात आली नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी संबंधित वाहनांवर नियमानुसार पुढील कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. नगरपालिकेकडून गौण खनिज उत्खनन अथवा वाहतूक केली जात असल्यास त्यासाठी तहसील कार्यालयाची पूर्वपरवानगी आवश्यक असते, असेही त्यांनी सांगितले.दरम्यान, दिवसा न करता रात्रीच्या वेळीच मुरूम वाहतूक का केली जात होती? परवानगीशिवाय ही वाहतूक कोणाच्या आदेशाने सुरू होती? असे अनेक प्रश्न या कारवाईनंतर उपस्थित झाले आहेत. नगरसेवकांनी वाहने सोडून देण्याची विनंती केली असली तरी ही कारवाई उपविभागीय अधिकारी स्तरावरील असल्याने नियमानुसारच प्रक्रिया होईल, अशी भूमिका तहसील प्रशासनाने घेतली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात नगरपालिका प्रशासनातील एकही अधिकारी अथवा कर्मचारी तहसील कार्यालयात हजर झाला नाही. त्यामुळे ही वाहने खरोखरच पालिकेच्या विकासकामासाठी वापरली जात होती की खासगी कामासाठी मुरूम वाहतूक करत होती, याबाबत संशय अधिक गडद झाला आहे. धाराशिव शहरात गौण खनिज वाहतुकीतील नियमभंगाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, रात्रीच्या अंधारात सुरू असलेल्या या वाहतुकीमागे नेमके कोणाचे संरक्षण आहे, याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.

# विधान परिषद निवडणुकीसाठी 60 कोरे अर्ज वितरित

## दोन उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल

आरंभ मराठी । धाराशिव

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उस्मानाबाद–लातूर–बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत ३२ व्यक्तींनी एकूण ६० कोरे नामनिर्देशनपत्रे घेतली आहेत, तर दोन उमेदवारांनी अधिकृतरीत्या नामनिर्देशनपत्र दाखल केले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. भारत निवडणूक आयोगाने भारत निवडणूक आयोग यांच्यामार्फत १८ मे २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार उस्मानाबाद–लातूर–बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची निवडणूक सूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सूचना प्रसिद्ध झाल्यापासून आतापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे ३२ जणांनी नामनिर्देशनपत्रे घेतली असून ६० कोरे अर्ज वितरित करण्यात आले आहेत. तसेच दोन उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले आहेत. दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता केवळ दोन दिवसांचा कालावधी शिल्लक राहिला आहे. शनिवार, ३० मे २०२६ आणि सोमवार, १ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जाणार आहेत. ही प्रक्रिया जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात पार पडणार असल्याचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विद्याचरण कडवकर यांनी कळविले आहे.

# मराठा आरक्षणाबाबत तत्काळ निर्णय घ्या,अन्यथा तीव्र आंदोलन

## अखंड मराठा समाजाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

आरंभ मराठी । धाराशिव




मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषणाचा इशारा दिल्याच्या पार्श्वभूमीवर अखंड मराठा समाजाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शांततामय मार्गाने लढा उभारला आहे. त्यांच्या आंदोलनामुळे संपूर्ण समाज एकत्र आला असून आरक्षणाच्या प्रश्नावर ठोस निर्णयाची अपेक्षा वाढली आहे. दिनांक ३० मे रोजी मनोज जरांगे पाटील पुन्हा आमरण उपोषणास बसणार असल्याचे नमूद करत, त्यांच्या पूर्वीच्या आंदोलनांमुळे प्रकृतीवर परिणाम झाल्याने त्यांच्या आरोग्याबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, राज्य शासनाने हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेटच्या आधारे मराठा समाजातील पात्र बांधवांना आरक्षणाची अंमलबजावणी तात्काळ सुरू करावी. तसेच शासनाने त्वरित शिष्टमंडळ पाठवून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करून उपोषण टाळावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. अन्यथा धाराशिव येथे तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही या निवेदनात देण्यात आला आहे.

# इंधन दरवाढीविरोधात धाराशिवमध्ये कॉँग्रेसचे जोरदार आंदोलन; सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणला

आरंभ मराठी । धाराशिव



पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅसच्या सातत्याने वाढणाऱ्या दरांविरोधात काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी (दि.२९) देशपांडे स्टॅण्ड येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. "इंधन दरवाढ रद्द करा", "महागाई करणारे सरकार हाय हाय", "सामान्य जनतेची लूट बंद करा", "शेतकरी विरोधी सरकारचा निषेध असो" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला सविस्तर निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, मागील ११ दिवसांत पेट्रोल व डिझेलच्या किमतीत तब्बल ८ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली असून ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. गेल्या १२ वर्षांत पेट्रोलच्या किमतीत सुमारे ३८ टक्के तर डिझेलच्या किमतीत ६२ टक्के वाढ झाल्याने नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. शेतकरी, महिला, छोटे व्यावसायिक तसेच मध्यमवर्गीय कुटुंबांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. गेल्या १२ वर्षांत केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील कर व उत्पादन शुल्काच्या माध्यमातून तब्बल ४३ लाख कोटी रुपयांचा महसूल गोळा केला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या वाढत्या किंमतींचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होत असून वाहतूक खर्च वाढल्याने जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य, भाजीपाला तसेच इतर आवश्यक वस्तूंच्या किंमतीत सातत्याने वाढ होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. डिझेल तुटवड्यामुळे राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर पुरवठा विस्कळीत झाला असून शेतीची कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली आहेत. पेट्रोल-डिझेल व घरगुती गॅसची दरवाढ तात्काळ मागे घ्यावी तसेच पेट्रोल-डिझेलचा पुरवठा कोणत्याही अडथळ्याविना सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. आंदोलनात जिल्हाध्यक्ष उमेश राजेनिंबाळकर, खलील सय्यद, प्रशांत पाटील, शहाजी मुंडे, उस्मान कुरेशी, संग्राम मुंडे, अशोक बनसोडे, गोरोबा झेंडे, मिलिंद गोवर्धन, शौकत मौलाना, वसंत मडके, दादासाहेब गायकवाड, संजय सरवदे, शिवाजी गायकवाड, अभिषेक बागल, धनंजय राऊत, सचिन गुरव, अंकुश पेठे, चंद्रकांत जाधव, आयुबखाँ पठाण, अचितराव घोगरे, ॲड. मुशरफ, अर्जुन बिराजदार, नाना भोसले, मधुकर यादव, विजय वाघमारे, अमित रेड्डी, मधुकर बिद्री, संग्राम पाटील, अप्पासाहेब शेळके, रोहन निरफळ आदी सहभागी झाले होते.

**आरंभ मराठी** — महावितरणच्या वीज कपातीमुळे शेतकरी संकटात; सहा तासांच्या पुरवठ्यातही वीज वारंवार खंडित

# महावितरण विभागाची मनमानी, शेतीचा वीजपुरवठा अचानक आठ तासांवरून सहा तासांवर

आरंभ मराठी । धाराशिव



शेतीसाठी पूर्वी उपलब्ध असलेला आठ तासांचा वीजपुरवठा महावितरणकडून अचानक कमी करून सहा तास करण्यात आल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. त्यातही या सहा तासांच्या कालावधीत दहा ते बारा वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतीचे संपूर्ण नियोजन कोलमडून पडत आहे. तीव्र उन्हाळा, वाढती उष्णता आणि पाण्याची कमतरता या पार्श्वभूमीवर महावितरणच्या या कारभारामुळे शेतकरी अक्षरशः संकटात सापडला आहे. सध्या राज्यभरात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावली असून अनेक ठिकाणी विहिरी, आड आणि बोअरवेल पूर्णपणे कोरडे पडले आहेत. अशा परिस्थितीत बागायतदार शेतकऱ्यांना पिकांना नियमित पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र वीजपुरवठा अनियमित असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही आणि त्यामुळे पिके करपण्याची भीती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी उन्हाळ्यातील गरज लक्षात घेता किमान आठ तास सुरळीत वीजपुरवठा अपेक्षित धरला होता. परंतु प्रत्यक्षात तो दोन तासांनी कमी करून सहा तास करण्यात आला आहे. त्यातही थ्री-फेज वीजपुरवठा सतत खंडित होत असल्याने मोटारपंप पूर्ण क्षमतेने चालू राहात नाहीत. परिणामी पिकांची वाढ खुंटत असून अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान सुरू झाले आहे.

वीजपुरवठा सुरू असलेल्या सहा तासांतही 10 ते 12 वेळा वीज जाते. त्यामुळे मोटार वारंवार बंद पडतात, पाणी उपसा अपूर्ण राहतो आणि सिंचनाचे चक्र बिघडते. याचा थेट परिणाम ऊस, भाजीपाला, फळबागा आणि उन्हाळी पिकांवर होत आहे. काही भागात तर पिके पूर्णपणे सुकून जाण्याच्या स्थितीत पोहोचली आहेत. शेती क्षेत्र आधीच आर्थिक संकटात सापडलेले असताना महावितरणच्या या अनियमित वीजपुरवठ्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. डिझेलची टंचाई आणि वाढलेले दर यामुळे ट्रॅक्टरद्वारे मशागतीची कामेही महागली आहेत. ट्रॅक्टर मालकांनी मशागतीचे दर एकरी 100 ते 150 रुपयांनी वाढवले आहेत. त्याचबरोबर बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या किंमतीही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. मात्र शेतमालाला अपेक्षित दर मिळत नसल्याने उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेळ बसत नाही. वीज खंडित होत असल्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. नदी-नाले कोरडे पडल्याने शेतकऱ्यांना विहीर आणि बोअरवेलच्या पाण्यावरच जनावरांची तहान भागवावी लागत आहे. अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याचाही तुटवडा जाणवत आहे. या परिस्थितीकडे तातडीने लक्ष देऊन किमान उन्हाळ्यात तरी सुरळीत वीजपुरवठा द्यावा, अशी मागणी केली आहे. महावितरणच्या या कारभाराविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# बोरी धरणाच्या मुख्य कालव्यात छिद्र पाडून पाणी चोरी

## अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी



आरंभ मराठी । नळदुर्ग

कुरनूर मध्यम प्रकल्प (बोरी धरण) येथील मुख्य कालव्याचे नुकसान करून बेकायदेशीररीत्या पाणी चोरी केल्याप्रकरणी अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी धाराशिव पाटबंधारे उपविभाग क्रमांक ७, नळदुर्गचे सहाय्यक अभियंता यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात तक्रार अर्जाद्वारे केली आहे. तक्रारीनुसार, कुरनूर मध्यम प्रकल्पातून कालव्याद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मात्र नळदुर्ग परिसरातून जाणाऱ्या मुख्य कालव्याच्या साखळी क्रमांक ४७८० जवळील अँक्वाडक्टच्या दगडी भिंतीला काही अज्ञात व्यक्तींनी रात्रीच्या वेळी बेकायदेशीरपणे छिद्र पाडल्याचे २८ मे रोजी क्षेत्रीय पाहणीदरम्यान निदर्शनास आले. या प्रकारामुळे कालवा तसेच सरकारी मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून कालव्यातून अवैधरित्या पाणी चोरी केली जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच अशा प्रकारामुळे कालवा फुटण्याचा धोका निर्माण झाला असून कायदेशीररित्या पाणी घेणाऱ्या इतर शेतकऱ्यांचेही नुकसान होत असल्याचे सांगण्यात आले.दरम्यान, या बेकायदेशीर पाणी चोरीचा फायदा गट क्रमांक २२२, २२४, २२५ आणि २२६ मधील शेतकऱ्यांना होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी तक्रार अर्जातून करण्यात आली आहे.

# विवेक आणि धार्मिकता

भूमिपुत्र वाघ,
उमरगा





मित्रांनो,जगभरात दान,गुप्त दान करण्याचा रेशो पाहिला तर तो भारतात सर्वात जास्त आहे,हे दान सर्वच धर्मातील लोक आपल्या आवडीच्या धार्मिक स्थळाना देताना जास्त दिसतात. बऱ्याच वेळ श्रद्धेपोटी लोक दान-धर्म करतात. श्रद्धा संपली की भीतीपोटी लोक दान करतात. भीती संपली की अंधश्रद्धे पोटी लोक दान करतात. काही लोक पापातून मुक्ती मिळवीण्यासाठी दान करतात. खरं तर सर्व मानवी मनाचे कंगोरे आहेत.भक्ती,दया,श्रद्धा, अंधश्रद्धा, पाप मुक्तता, या भावनेच्या आधारावर हे दान धर्म म्हणून केल्याचे दिसते.सोबत इच्छापूर्तीसाठी आणि प्रतिष्ठेसाठी ह्याही गोष्टीसाठी लोक दान धर्म करतात.त्यातील चांगले आणि वाईट दोन्ही गोष्टीचं चिंतन आपण आज करणार आहोत.

विवेक जागृत ठेवून ज्या ज्या गोष्टी आपण करतो त्या चांगल्या आसतात. असं समाजमन बोलते. प्रथम आपण विवेकी विचारातून केलेल्या कार्याबद्दल विवेचन करणार आहोत.श्रद्धा,भाव,भक्ती या माध्यमातून जे दान आपण आपल्या धार्मिक स्थळांना देतो,लोकांना मदत मदत करतो,पिढीतांना मदत करतो.ते सर्वात छान आहे.यातून माणसाला आनंद मिळतो. समाजात मान्यता मिळते. त्या व्यक्तीचं कौतुकही होतं.जसे विविध सण, उत्सव,महोत्सव असतात,त्यावेळी आपण जेवण देतो.धन दान करतो. त्यातून त्या माणसांना, दान दात्यांना समाधान आणि आनंदही मिळतो. सामाजिक प्रतिष्ठाही मिळते. या दानाला या, मदतीला समाजामध्ये विशेष स्थान दिलं जातं. कारण ते दान हे निस्वार्थ भावनेनी दिलेले असते.मग ते दानपेटीत देऊ देत.जेवणावळी घालू देत.त्या अन्नदानाला विशेष स्थान प्राप्त झालेला आहे. प्रत्येक धर्माच्या रीतीरिवाजामध्ये अन्नदानाला विशेष महत्त्व आणि स्थान दिलेला आहे. त्या दान दात्याला पुण्यवान व्यक्ती असेही संबोधले जाते.त्यातून समाजमनाची निर्मिती होते.लोक चांगुलपणा पाहत असतात.तसंच अनुकरण करण्याचा प्रयत्न करत असतात. यातून दायित्वाची भावना निर्माण होते.परोपकाराची भावना निर्माण होते.तेव्हा अशा कार्य करणाऱ्यांना, दानशूर म्हणूनही संबोधले जाते. अशा पद्धतीची मदत,अशा पद्धतीचं दान,अशा पद्धतीचे कार्य हे सामाजिक बदलासाठी समाजमन तयार करण्यासाठी दायित्वाची भावना निर्माण करण्यासाठी होते.म्हणून अशा दानाला समाजामध्ये विशेष मान्यता आहे.त्या दानामध्ये कुठलाही स्वार्थ नसतो.फक्त भाव आणि भक्तीचा संगम असतो. आता आपण अविवेकी दान म्हणजे काय? त्याचा विचार करणार आहोत. अंधश्रद्धेच्या पोटी केलेलं दान,पापातून मुक्ती मिळविण्यासाठी केलेलं दान,प्रतिष्ठेसाठी आणी मोठेपणा मिळविण्यासाठी केलेलं दान.धन मिळविण्यासाठी केलेले दान यास मानवी धर्म मान्यता देत नाही. समाज मान्यता देत नाही.जो असे कृत्य करतो, त्यालाही समाधान मिळत नाही. कारण तो आशा घेऊन येत असतो. अपेक्षा घेऊन तो दान करत असतो. काही मागणी करत असतो. काही मिळवण्यासाठी तो कधीकधी बळीही देत असतो. यामध्ये पशुबळी असेल,नरबळी असेल असे अविवेकी कार्य तो करत असतो.पाप केलं म्हणून मुक्ती मिळविण्यासाठी धार्मिक स्थळांना देणगी देतो.गुप्तदान करतो, नावासाठी,प्रतिष्ठा मिळवण्यासाठी दान करणारे असेही महाभाग भरपूर दिसतात. मी दान दाता आहे हा अविर्भाव समजाला दाखवण्याचा अटहास ते करत असतात. इतका आटापिटा करूनही त्यांना शांतता मिळत नाही. शांत झोप लागत नाही. किंवा आनंद मिळत नाही. किंवा पुण्य केल्याचं समाधान मिळत नाही.पाप केल्यानंतर देवाचा प्रकोप होऊ नये,म्हणून देवाला बळी दिला जातो. भीतीपोटी, देवाला वश करून घेण्यासाठी, लाच या पद्धतीने देवाला दान करतात.आणि मागणी घालतात, देवा माझं भलं कर.मला माफ कर.देवा मी चुकलो. मी तुला पैसे देतो. सोनं देतो. बकरं कापतो. कोंबड कापतो. जमल्यास नरबळी देतो. इथपर्यंत माणूस जातो आणि देवाला खरेदी करण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. मित्रांनो खरं बोलायचं झालं तर विवेक जागृत ठेवून, सत्याचं वास्तव समोर ठेवून, विज्ञान वाद स्वीकारून, चिंतन करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तुमच्या माझ्या भाबड्या कल्पनेचा विचार करून खरच देव आहे असे गृहीत धरून आपण काम करायला लागलो तर, जो देव सृष्टीचा निर्माता आहे. त्यानं हवे तसे,प्राणी, पक्षी, झाडे फुल झाडे किती-किती हर तऱ्हेनी सृष्टी निर्माण केली आहे. लाखो रंग वापरलेले आहेत. हुरळून जावं एव्हढी सुंदर सृष्टी निर्माण केली आहे. विविध प्रकारचे लाखो जीव निर्माण केलेले आहे.त्याला हवं तसं निर्माण करतो. त्याला नको वाटलं तर तो समाप्त करतो.तोच करतो आणि तोच मारतो. तर मग आपल्यासारख्या शूद्र माणसाकडून एखादा बळी घेण्याची त्याची इच्छा कशी व्हावी .ह्या सर्व माणसांच्या मनाच्या विकृत आणि स्वार्थी कंगोऱ्याचा भाग आहे. माणसांच्या गरजा, पुर्ण करण्यासाठी पैसा असेल,सोनं असेल, किंवा इतर वस्तू असतील ही साधने माणसाच्या सोयी आणि सुविधा निर्माण करण्यासाठी माणसाने निर्माण केलेल्या आहेत. देव आहे असं गृहीत धरले तर जो देव ह्या पृथ्वीचा निर्माता आहे. त्याला तुमच्या कागदी नोटाचा काहीच उपयोग नाही. त्याला त्याची गरजच नाही.कारण तो सर्व करता करावीत आहे.त्या साधनाचा, त्या पैशाचा, त्या सोन्याचा देवाला काहीच उपयोग नाही.त्याला काहीच घेणं देणं नाही. जर निर्मिती ही त्याचीच असेल तर आपण त्याला परत द्यायची गरज काय. ? हे विश्व त्याचं असेल तर आपण निर्माण करून त्याला देणारे कोण? कुणीतरी लुटारू आपल्याला भीती दाखवतो,आणि त्या भीतीतून मुक्त होण्यासाठी आपण देवाला वश करण्याचा प्रयत्न करतो. हे सर्व धादांत खोटे आहे. चुकीचं आहे. काल्पनिक आहे.अशा गोष्टीवर विश्वास ठेवून कुठलेच कार्य माणसांनी करू नये.आपण आपल्या पैशाच्या, सोन्याच्या जोरावरती देवाला खरेदी करतो,असा त्याचा अर्थ आहे.आणि हे सर्व खऱ्या अर्थाने निरर्थक आहे.चुकीच आहे. यातून देवाचं समाधान नाही,ना तुमचं नाही. मग हा उठा ठेऊ कशासाठी? हे चिंतन, हा अभ्यास ज्या लोकांचा विवेक जागृत असतो ते लोक तसे वर्तन करत नाहीत. आपण मागील पाच-पन्नास वर्षाचा विचार केला तर प्रत्येक धार्मिक स्थळांना जो पैसा, सोने, संपत्ती जमा होत आहे, ती अफाट आहे. मग ती धार्मिकतेच्या नावानी असो की इच्छापूर्तीच्या नावाखाली असो, भीती पोटी असो, चोरीपोटी असो,ही कोट्यावधीची प्रॉपर्टी धार्मिकतेच्या नावाखाली एकत्र जमा होते.ती जमा झालेली प्रॉपर्टी हे आजूबाजूचे अगले बगले, दैववाद सांगणारे,देवालाच लुटतात.असेच लोक वेळ पडली तर चोऱ्याही करतात.म्हणून खूप वेळा धार्मिक स्थळी चोरी झाल्याच्या बातम्या पेपरला छापल्या जातात. धार्मिक स्थळांना दान कारवे,की नाही,हा प्रत्येकाच्या स्वभावाचा भावनेचा भाग आहे.

विवेक काय सांगतो. धर्म का करावा,दान का आणी केंव्हा करावं,आपला धम्म काय सांगतो, तहानलेल्यांना पाणी द्या.भुकेलेल्यास अन्न द्या. बुडत्याला काठीचा आधार द्या. माणूस,प्राणी,पक्षी, पृथ्वीवरचे सर्व जीव सुखी राहायला पाहिजे.ही पृथ्वी आनंदी राहिली पाहिजे. सुखी राहिली पाहिजे. सृष्टी फुलताना,फळताना दिसली पाहिजे. याच्यासाठी जे जे करता येते ते ते माणसांनी केलं पाहिजे. आज पृथ्वीवर वरुणाचा प्रकोप होताना दिसतो आहे.जल, जंगल,पाण्या खाली जातं आहे. डोंगर,दऱ्या,कड्या, कपारी कोसळत आहेत.माणसं, गावच्या गावं मातीमोल होताना दिसत आहेत. हा देवाचा प्रकोप नाही तर माणसाने केलेलं नुकसान आहे.आता ते भरून काढणे शक्य नाही. मग माणसाने काय करावं असा प्रश्न समोर येत असेल तर,विकलांगाशी, दुर्बलांशी, अबलांशी दान करावं.तहानल्यांशी पाणी द्यावं.हेच कार्य सर्वदा करावं,आणि जाता जाता पाणी शुद्ध आणि पवित्र राहील पाहिजे, जंगल जिवंत राहीलं पाहिजे.फळे-झाडे फुलत राहिली पाहिजेत, याच्यासाठी काम करावं. यातच पुण्य मिळेल. पुण्य म्हणजे तरी काय?आनंद आणि समाधान. ज्यांना रात्री अंग टाकल्यासोबत खुशाल झोप येते तेच खरे पुण्य आहे. ईश्वर आहे हे जर आपल्या मनात दृढ असेल तर तो पाहायचा असेल तर ज्यांना आपण दान करतो, त्यांचे एकदा स्माईल पहा.त्याच्यात खऱ्या अर्थाने ईश्वराचे प्रतिरूप दिसायला लागेल. सांगायचा महत्त्वाचा आणि शेवटचा भाग म्हणजे विवेक जागृत ठेऊन समाज हिताचं कार्य करत राहिलं पाहिजे. शिक्षण ही ज्ञानगंगा म्हटली जाते.तर मग एका बाजूला शाळा पडताना का दिसते?? तर दुसऱ्या बाजूला सोन्याची धार्मिक स्थळे उभरताना का दिसतात. यातील योग्यता तपासणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी योग्य मार्गाने जाण्यासाठी विवेक जागृत ठेवणे हेच महत्त्वाचे ठरेल.

## ॲट्रॉसिटी प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

आरंभ मराठी । धाराशिव

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत दाखल झालेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक शुक्रवारी (दि.२९) जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर,समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले तसेच समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीत मार्च २०२६ अखेर घेण्यात आलेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. यावेळी अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत प्रलंबित प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मार्च २०२६ अखेर पोलीस तपासावर प्रलंबित असलेल्या २१ प्रकरणांपैकी आठ प्रकरणांत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून एका प्रकरणाचा निपटारा करण्यात आला आहे. अद्याप १२ प्रकरणे प्रलंबित असून २७ मे अखेर आणखी चार प्रकरणांत दोषारोप अहवाल दाखल झाल्याची माहिती जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या सदस्य सचिवांनी दिली. सद्यस्थितीत एप्रिल २०२६ अखेर एकूण २६ प्रकरणे तपासावर प्रलंबित आहेत. त्यापैकी २४ प्रकरणे ही ६० दिवसांच्या आतील असून दोन प्रकरणे ६० दिवसांपेक्षा अधिक कालावधीपासून प्रलंबित असल्याचेही बैठकीत सांगण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी पुजार यांनी संबंधित विभागांनी प्रकरणांच्या तपासात गती आणून पीडितांना वेळेत न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तत्परतेने करण्याचे निर्देश दिले.

### ज्ञानाचा हा झरा

शेतकऱ्याच्या ह्या पोरा,
मातीचा हा लळा।
गुरु दीक्षेचा हा सोहळा,
ज्ञानाचा हा मळा फुलला
कर्मवीरा।।

त्यागाच्या ह्या कळा,
झेलूनी अपमानाच्या झळा।
शेतकऱ्याच्या ह्या घरा,
शिक्षणाचा हा झरा तुम्ही
कर्मवीरा।।

अहंपणाचा हा डोंगर,
कसा करू पार?
होतो शब्दाचा हा वार,
उघडा संस्काराचे दार
कर्मवीरा।।

तुमच्या विचाराच हे लेन,
बहुजनाच्या घरच सोन।
तुमच्या कष्टाचे हे गाणं,
गाऊ आम्ही कर्मवीरा।।

प्रा.अशोक चंद्रकांत पाटील
हिंदी विभाग,
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय,वाशी
मो. 9561879657

## अवैध जुगार अड्ड्यावर पोलिसांची धडक कारवाई, 11 जण ताब्यात


आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव शहरालगत तुळजापूर-बीड महामार्ग बायपास परिसरात सुरू असलेल्या अवैध तीन पत्ती (तिरट) जुगार क्लबवर पोलिसांनी धडक छापेमारी करत ११ आरोपींना ताब्यात घेतले. या कारवाईत सुमारे ३ लाख ९० हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक रीतु खोखर आणि अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली, परि. पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. छापेमारीत सहायक पोलीस निरीक्षक विजय आटोळे, QRT अंमलदार व चालक यांनी सहभाग घेतला. पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकत अवैधरित्या सुरू असलेला जुगार अड्डा उद्ध्वस्त केला. यावेळी ११ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ च्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान आरोपींकडून जुगाराचे साहित्य, ३७ हजार ७७० रुपये रोख रक्कम, एक चारचाकी वाहन, दहा दुचाकी वाहने तसेच इतर मुद्देमाल असा एकूण ३ लाख ९० हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# एल निनोच्या सावटाखाली पीक पद्धतीत बदल आवश्यक

बालाजी देशमुख,
सहाय्यक कृषी अधिकारी,
कळंब.





राज्यात यंदाच्या मान्सूनवर एल निनोचे स्पष्ट सावट दिसून येत असून हवामानातील बदलांमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. हवामान विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार यंदा पावसाचे अनियमित वितरण, पावसातील दीर्घ खंड, कमी पर्जन्यमान तसेच वाढते तापमान यामुळे खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोरडवाहू भागात या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसू शकतो. एल निनो ही प्रशांत महासागरातील नैसर्गिक व चक्रीय हवामान प्रक्रिया असून या काळात व्यापारी वारे कमकुवत होतात आणि समुद्रातील उष्ण पाणी दक्षिण अमेरिकेकडे सरकते. परिणामी वातावरणातील दाब, वाऱ्यांची दिशा आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते व भारतासह अनेक आशियाई देशांमध्ये मान्सून कमकुवत होण्याची शक्यता वाढते. यामुळे मान्सून उशिरा सुरू होणे, पावसाचे दिवस कमी होणे, दीर्घ खंड पडणे, काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत दुष्काळ, तापमानात वाढ, उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढणे, भूजल पातळी खालावणे आणि पाणीसाठ्यांमध्ये घट होणे अशा परिणामांना सामोरे जावे लागू शकते. महाराष्ट्रातील बहुतांश शेती ही पावसावर आधारित असल्याने एल निनोचा परिणाम थेट शेतीवर होतो. पाऊस वेळेवर न आल्यास पेरणी उशिरा होते, दुबार पेरणीची वेळ येते, पेरणीनंतर पावसाचा खंड पडल्यास बियाण्यांची उगवण कमी होते, जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने झाडांची वाढ खुंटते आणि उत्पादनात मोठी घट होऊ शकते. तसेच वाढत्या तापमानामुळे मावा, तुडतुडे, अळी यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, मका, ज्वारी आणि बाजरी या पिकांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसू शकतो. विशेषतः सोयाबीन आणि कापूस या पिकांना सुरुवातीच्या काळात चांगल्या पावसाची आवश्यकता असते. कृषी विद्यापीठांनी एल निनो परिस्थितीत सोयाबीन पिकासाठी ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्यानंतरच पेरणी करणे, कमी कालावधीच्या जातींची निवड करणे, बीबीएफ (ब्रॉड बेड फरो) व सरी-वरंबा पद्धतीचा अवलंब करणे, बीजप्रक्रिया करणे, पावसाचा खंड पडल्यास आंतरमशागत करणे आणि मल्चिंगद्वारे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवणे अशा उपाययोजना सुचवल्या आहेत. बीबीएफ पद्धतीमुळे अतिरिक्त पाण्याचा निचरा होतो, ओलावा टिकून राहतो आणि पिकांना ताण कमी येतो. तसेच सोयाबीन + तूर, कापूस + मूग, बाजरी + उडीद आणि तूर + ज्वारी यांसारखी आंतरपीक पद्धती स्वीकारल्यास एका पिकाचे नुकसान झाले तरी दुसऱ्या पिकातून उत्पन्न मिळण्याची शक्यता राहते. हवामान बदलामुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढू शकत असल्याने रायझोबियम, पीएसबी जीवाणू संवर्धक, ट्रायकोडर्मा आणि जैविक बुरशीनाशकांचा वापर करून बीजप्रक्रिया करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंवर्धन हा सर्वात महत्त्वाचा उपाय मानला जात असून शेततळे, बांधबंदिस्ती, कंटूर बंडींग, पावसाचे पाणी साठवण, ठिबक व तुषार सिंचन तसेच मल्चिंगचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे. ठिबक सिंचनामुळे ४० ते ६० टक्के पाण्याची बचत होते, पिकांना आवश्यक तेवढेच पाणी मिळते आणि खतांचा कार्यक्षम वापर होतो. यासोबतच सेंद्रिय खतांचा वापर, खोल नांगरट आणि पिकांचे अवशेष शेतात ठेवून जमिनीची पाणीधारण क्षमता वाढविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कमी पावसामुळे पशुपालन क्षेत्रालाही मोठा धोका निर्माण होऊ शकतो. हिरव्या चाऱ्याची टंचाई, जनावरांच्या आरोग्यावर परिणाम, दूध उत्पादनात घट आणि चाऱ्याच्या दरात वाढ होण्याची शक्यता असल्याने पशुपालकांनी चारा साठवणुकीवर भर द्यावा, असे तज्ज्ञांनी सांगितले आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना हवामान अंदाज पाहूनच पेरणी करावी, पेरणीची घाई करू नये, कमी कालावधीच्या वाणांची निवड करावी, पीक विमा काढावा, आंतरपीक पद्धती स्वीकारावी आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असा सल्ला दिला आहे. भविष्यात हवामान बदलाचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेता हवामान आधारित शेती, आधुनिक सिंचन तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, हवामान अंदाजावर आधारित निर्णय आणि कमी खर्चातील शेती पद्धतींना प्राधान्य देणे ही काळाची गरज बनली आहे. एल निनो ही केवळ हवामान प्रक्रिया नसून शेती, पाणी व्यवस्थापन, पशुपालन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर उभे राहिलेले मोठे आव्हान आहे. मात्र योग्य नियोजन, जलसंवर्धन, आंतरपीक पद्धती, हवामान आधारित शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास या संकटावर मोठ्या प्रमाणात मात करता येऊ शकते. "सजग शेतकरी, सुरक्षित शेती" हा मंत्र स्वीकारून बदलत्या हवामानाशी जुळवून घेणे आवश्यक आहे.

## कृषी महाविद्यालयाचे ६३ कृषीदूत गावोगावी राबवणार कृषी जनजागृती अभियान

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळावी तसेच उत्पादनवाढीसाठी मार्गदर्शन व्हावे, यासाठी कृषी महाविद्यालय आळणी (गडपाटी) येथील ६३ कृषीदूत व कृषीकन्या विविध गावांमध्ये कृषी जनजागृती अभियान राबवणार आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पोकरा योजनेतील आळणी, खेड, हिंगळजवाडी, खामगाव, तेर, वरुडा आणि उपळा या गावांमध्ये विद्यार्थी वास्तव्यास राहून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. यावेळी बीज प्रक्रिया, माती परीक्षण, कीड व रोग व्यवस्थापन, आधुनिक शेती पद्धती तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थी प्रत्यक्ष शेतात जाऊन प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती देणार असल्याने ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. शेतीमधील नवीन तंत्रज्ञान आणि संशोधनाची माहिती थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जाणार आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना, विद्यापीठाचे संशोधन व तंत्रज्ञान शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे काम विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे करावे, असे आवाहन केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पवार पक्षाची संघटनात्मक बैठक उत्साहात




आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या उपस्थितीत BLA संदर्भात मतदार बूथनिहाय व केंद्रनिहाय प्रतिनिधी नियुक्तीसाठी सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण संघटनात्मक बैठक उत्साहात पार पडली. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित या बैठकीत बूथस्तरावरील नियोजन, प्रतिनिधी नियुक्ती तसेच पक्ष विस्तारावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत प्रत्येक मतदान केंद्रावर सक्षम व सक्रिय प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक प्रभावी करण्यासाठी तालुका, शहर आणि बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. "बूथ मजबूत तर पक्ष मजबूत" या ध्येयाने प्रत्येक पदाधिकाऱ्याने आगामी काळात सक्रियपणे काम करावे, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीस तुळजापूर तालुकाध्यक्ष धैर्यशील पाटील, उमरगा तालुकाध्यक्ष संजय पवार, कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, परंडा तालुकाध्यक्ष किरणकुमार करळे यांच्यासह युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, शहराध्यक्ष नगरसेवक आयाज उर्फ बबलू शेख, महिला जिल्हाध्यक्ष मनीषाताई पाटील, युवक प्रदेश सरचिटणीस प्रवीण घोलप, नगरसेवक सुनील आंबेकर, नगरसेवक पंकज भोसले, नगरसेवक सर्फराज कुरेशी, नगरसेवक अशोक देवकते, प्रदेश सरचिटणीस रामेश्वर पवार, प्रदेश सचिव मीनल काकडे, प्रदेश सचिव पृथ्वीराज आंधळे, ॲड. योगेश सोन्नेपाटील, जिल्हा सचिव सुहास ठोंगे, लीगल सेल जिल्हाध्यक्ष ॲड. अविनाश जाधव, शिक्षक जिल्हाध्यक्ष प्रा. जालिंदर पोळ, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष अफसर मुल्ला, ज्योतीताई माळाळे, सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कसबे, युवक तालुकाध्यक्ष अमर गुंड, इंजिनिअर सेल जिल्हाध्यक्ष सुरज वडवळे, माजी सैनिक विभाग परंडा तालुकाध्यक्ष दत्ता कुंभार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
» पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

# नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ देणे ही मोठी सामाजिक जबाबदारी: आमदार कैलास पाटील

## ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन उत्साहात; साहित्य, संस्कृती आणि विचारांचा संगम

**आरंभ मराठी । धाराशिव**

साहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून समाजाला दिशा देणारे, वास्तवाचा आरसा दाखवणारे आणि विचारांना चालना देणारे प्रभावी माध्यम आहे. साहित्यिक हा समाजाचा सजग प्रहरी असून लोकशाहीत अभिव्यक्ती स्वातंत्र्य जिवंत ठेवण्याचे मोठे कार्य साहित्यिक करत असतात, असे प्रतिपादन स्वागताध्यक्ष तथा आमदार कैलास पाटील यांनी केले. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३२ वे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. यावेळी महाराष्ट्र, कर्नाटकासह विविध भागांतून आलेले साहित्यिक, कवी, लेखक, विचारवंत, पत्रकार आणि रसिक उपस्थित होते. कार्यक्रमास संमेलनाध्यक्ष नंदकुमार राऊत, शिक्षक आमदार विक्रम काळे, साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे, कर्नाटक राज्याध्यक्ष रविंद्र पाटील, सुमनगीता काळभोर, गुरु भांगे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित



होते. आमदार पाटील म्हणाले की, मराठवाडा ही संत, साहित्यिक आणि समाजप्रबोधनाची भूमी असून मराठी भाषा आणि संस्कृती जपण्याचे मोठे कार्य या भूमीने केले आहे. संत गोरोबा काका, तुळजाभवानी देवी आणि अनेक विचारवंतांच्या कार्याचा वारसा धाराशिव जिल्ह्याला लाभला आहे. आज सोशल मीडियावरील ट्रोलिंग, वैचारिक ध्रुवीकरण आणि दबावामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर संकट निर्माण होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाने प्रत्येकाला विचार मांडण्याचा मूलभूत अधिकार दिला असून लेखणी निर्भय असेल तरच समाज जागृत राहतो, असे ते म्हणाले. नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ मिळणे कठीण होत असताना शरद गोरे यांनी गेल्या तीन दशकांपासून सातत्याने साहित्य संमेलने आयोजित करून नवोदित लेखकांना संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार पाटील यांनी त्यांचे कौतुक केले. तसेच साहित्यिक, कवी आणि लेखकांना शासनदरबारी योग्य सन्मान मिळावा यासाठी आपण आणि शिक्षक आमदार विक्रम काळे प्रयत्नशील राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले. संमेलनाच्या प्रारंभी दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या कार्यावर आधारित कविता संग्रह आणि ग्रंथाचे प्रकाशनही करण्यात आले. यावेळी शेतकरी, माती आणि ग्रामीण वास्तव प्रभावीपणे मांडणारे ज्येष्ठ साहित्यिक भास्कर चंदनशिव यांना मरणोत्तर 'साहित्य जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.त्यांच्या लेखणीतून "लाल चिखल" सारख्या साहित्यकृतींमधून ग्रामीण संघर्ष उभा राहिला. महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या विचारधारेचा वारसा पुढे नेण्याचे काम त्यांनी केले, असे आमदार पाटील यांनी सांगितले.

## तपोरत्न भक्तनिवासमुळे भाविकांच्या सुविधेत भर - डॉ.महास्वामी

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर येथील जंगम मठ येथे होटगी मठ संस्थांनच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या भव्य भक्त निवासामुळे श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेत भर पडणार असल्याचे काशीपीठाचे जगदगुरु डॉ.मल्लिकार्जुन महास्वामीजी यांनी भक्त निवासाच्या भूमिपूजन प्रसंगी बोलताना म्हणाले.यावेळी व्यासपीठावर पंढरपूर देवस्थान समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार विजयकुमार देशमुख, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, नगराध्यक्ष विनोद गंगणे, गुड्डापूर देवस्थान समितीचे सिद्धया स्वामी, ज्येष्ठ नेते आप्पासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे, सोलापूर जिल्हा परिषदेचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष अमर मगर, गटनेते औदुंबर कदम, नगरसेवक रणजीत इंगळे, आनंद जगताप, राजाभाऊ मुंडे, ट्रस्टचे गुरुनाथ बडूरे, आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम गहिनीनाथ महाराज, अर्चनाताई पाटील, विनोद गंगणे, यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न झाल्यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले यावेळी बोलताना जगदगुरु म्हणाले की देवीचे महात्म्य संपूर्ण देशात असून देशभरातून दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येतात त्यामुळे अशा भक्तनिवासामुळे भाविकांची सोयीत भर पडेल तसेच या ठिकाणी नागरिकासाठी महादेवाचे मंदिर व सभा मंडप करण्यात येणार आहे यावेळी बोलताना अर्चनाताई पाटील यांनी म्हणाले की धार्मिक क्षेत्रातील काशी पीठाचे जगद्गुरूंच्या आशीर्वादाने या ठिकाणी भूमिपूजन झाल्याने हे काम पूर्णत्वास जाणार असून या कामास कोणतेही अडचणी येणार नाहीत व नगरपालिका व आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे सर्वोत्तरी सहकार्य राहील तसेच या ठिकाणी निधी देणार असल्याचे ते म्हणाले काशी विश्वनाथ मंदिर कडून दरवर्षी श्री तुळजाभवानी मंदिरास मानाचा महावस्त्र येण्यासाठी जगदगुरुनी व नगरपालिकेने प्रयत्न करावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर व आमदार देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले.

# तुळजापूर शहरातील खुल्या मटका व्यवसायास अभय कोणाचे ?

## अवैध धंद्यांविरोधात कारवाईची मागणी; सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांचे निवेदन

**आरंभ मराठी । तुळजापूर**

आई तुळजाभवानीच्या पुण्य पावन वास्तवाने पावन झालेल्या तीर्थक्षेत्र तुळजापूर नगरीमध्ये सध्या अवैध धंद्यांना मोठ्या प्रमाणात ऊत आला असून शहरात खुलेआम मटका व्यवसाय सुरू असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी केला आहे. विशेष म्हणजे हा व्यवसाय उघडपणे सुरू असतानाही पोलीस प्रशासन याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. याबाबत तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, पालकमंत्री आणि आमदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरातील जुन्या बसस्थानकाच्या पाठीमागे तुळजाभवानी मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावर खुल्या जागेत अवैध मटका व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर ठिकाणी बिनधास्तपणे सुरू असलेला हा व्यवसाय सामान्य नागरिक, युवक तसेच गरीब कुटुंबांच्या आर्थिक आणि सामाजिक आयुष्यावर गंभीर परिणाम करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक कुटुंबे या अवैध मटका व्यवसायामुळे उद्ध्वस्त झाली असून नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. इतक्या उघडपणे सुरू असलेला हा




प्रकार स्थानिक पोलीस प्रशासनाला कसा दिसत नाही? असा सवालही या निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी आणि पुरावे समोर येऊनही संबंधितांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोबल वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने आता कठोर भूमिका घेत अशा अवैध व्यवसायांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, तुळजापूर शहरामध्ये मटका, गुटखा तसेच इतर अवैध धंद्यांना खुलेआम ऊत आल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. मात्र या सर्व प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली दिसून येत नसल्याने कारवाई न करण्यामागचे नेमके गौडबंगाल काय? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. गेल्या एक महिन्याभरात तुळजापूर शहरामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या अनेक गंभीर घटना घडल्या आहेत. खून, मारामारी आणि इतर गुन्हेगारी स्वरूपाच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच अवैध धंद्यांनाही आलेला ऊत ही चिंतेची बाब मानली जात आहे. त्यामुळे शहरातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. सामाजिक कार्यकर्ते जयकुमार पांढरे यांनी संबंधित विभागांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन अवैध मटका व्यवसाय, गुटखा विक्री आणि इतर बेकायदेशीर धंद्यांवर विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

# महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे सांगवी मार्डी गाव अंधारात

## ग्रामपंचायतकडून तात्काळ उपाययोजनेची मागणी

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील ग्रामीण भागात महावितरणच्या ढिसाळ आणि नियोजनशून्य कारभारामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक गावांमध्ये वारंवार वीज पुरवठा खंडित होत असून, अनियमित वीज वितरणामुळे ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः वाढत्या उकाड्यात नागरिक अक्षरशः हैराण झाले असून महावितरणच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. सध्या तापमानात मोठी वाढ झाल्याने नागरिकांना उष्णतेचा मोठा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत कोणतीही पूर्वसूचना न देता वारंवार वीज गुल होत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामांवर परिणाम होत आहे. अनेक वेळा कोणतेही तांत्रिक कारण नसताना तासन्तास वीज पुरवठा खंडित राहत असल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. ग्रामीण भागात ज्या ठिकाणी लोकवस्ती आहे, त्या परिसरात शेतातील सिंगल फेज लाईनद्वारे



वीज पुरवठा केला जातो. मात्र सध्या अनेक गावांमध्ये सिंगल फेज वीज पुरवठा बंद करण्यात आल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात जात असून चोरीच्या घटनांमध्ये वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यासंदर्भात ग्रामपंचायत सांगवी मार्डी कार्यालयाच्या वतीने महावितरणकडे तात्काळ दखल घेऊन बंद असलेला सिंगल फेज वीज पुरवठा पूर्ववत सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तसेच ग्रामीण भागातील सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरणने तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, स्मार्ट मीटरच्या नावाखाली नागरिकांच्या वीज बिलामध्ये मोठी वाढ होत असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. एका बाजूला वाढीव वीज बिले आकारली जात असताना दुसऱ्या बाजूला दर्जेदार सेवा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. लाखो रुपयांची वसुली करणाऱ्या महावितरणने केवळ बिल वसुलीकडे लक्ष न देता ग्रामीण भागातील वीज सेवा सुधारण्यावर भर द्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या धाराशिव जिल्हा कार्याध्यक्षपदी किरण राठोड यांची निवड

**आरंभ मराठी । अणदूर**

तुळजापूर तालुक्यातील येडोळा येथील सामाजिक कार्यकर्ते किरण धोंडीराम राठोड यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या धाराशिव जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उमेश राठोड यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. किरण राठोड हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात सक्रिय असून बंजारा समाजाच्या विविध प्रश्नांवर काम करत आहेत. समाजातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या समाजाभिमुख कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्यांच्या निवडीबद्दल येडोळा गावासह तुळजापूर तालुका व धाराशिव जिल्ह्यातील विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

दैनिक आरंभ मराठी

## बदलत्या हवामानामुळे गावरान आंब्याचे उत्पादन घटले

# बांधावरील गावरान आंब्यांची परंपरा लोप पावताना लोणच्याचा दरवळही झाला बाटलीबंद

**आरंभ मराठी । तेर**

काळाच्या ओघात ग्रामीण भागातील अनेक परंपरा आणि संस्कृती हळूहळू लोप पावत चालल्या असून, त्यामध्ये बांधावरील गावरान आंब्यांच्या झाडांची परंपराही आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. एकेकाळी गावोगावी शेतकऱ्यांच्या बांधावर डौलाने उभ्या असलेल्या गावरान आंब्यांच्या मोठमोठ्या झाडांनी ग्रामीण जीवन समृद्ध केले होते. मात्र बदलती कुटुंब व्यवस्था, शेतीतील बदल आणि संकरित वाणांच्या वाढत्या प्रचलनामुळे ही झाडे आता दुर्मिळ होत चालली आहेत. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती अस्तित्वात असल्याने शेतीचे मोठे क्षेत्र आणि त्यावरील बांध जपले जात होते. बांधावर आंबा, चिंच, लिंबू यांसारखी झाडे मोठ्या प्रमाणात असायची. परंतु काळ बदलला, कुटुंबांचे विभाजन झाले आणि शेतीचे तुकडे पडत गेले. त्यातून बांध कमी झाले आणि त्यावरील झाडेही नष्ट होत



गेली. परिणामी ग्रामीण भागातील गावरान आंब्यांची ओळख हळूहळू पुसली जात आहे. गावरान आंब्यांचा स्वाद, सुगंध आणि त्यापासून तयार होणारे लोणचे हे ग्रामीण संस्कृतीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जात होते. उन्हाळा सुरू झाला की घराघरांत लोणचे तयार करण्याची लगबग दिसून यायची. महिलावर्ग मोठ्या उत्साहाने मसाले तयार करून मातीच्या बरण्यांमध्ये लोणचे साठवून ठेवत असे. वर्षभर जेवणाची चव वाढवणारे हे लोणचे प्रत्येक घराचा अविभाज्य भाग होते. मात्र आता बाजारात उपलब्ध होणाऱ्या बाटलीबंद लोणच्यांनी या परंपरेची जागा घेतली आहे. त्यामुळे गावरान आंब्याच्या लोणच्याचा दरवळही आता बाटलीतच बंदिस्त झाला आहे. पूर्वी उन्हाळ्यात ऊसाच्या पाचटात आंबे पिकवण्याची पद्धत होती. पिकलेले आंबे घरातील सर्व मंडळी एकत्र बसून खात असत. त्या क्षणांतून नात्यांमध्ये गोडवा निर्माण होत असे. आजच्या धावपळीच्या जीवनात आणि संकरित आंब्यांच्या बाजारात ती चव, तो सुगंध आणि ती एकत्रितपणाची भावना हरवलेली दिसून येते. गावोगावी असलेल्या आंबराया देखील आता इतिहासजमा होत आहेत. पूर्वी गावाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर आंब्यांची झाडे दिसून येत असत. अनेक पक्षी, जनावरे आणि पर्यावरणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या या आंबराया आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचा परिणाम ग्रामीण पर्यावरणावरही होत असल्याची खंत ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत. संकरित वाणांच्या आंब्यांनी बाजारपेठ व्यापली असली तरी गावरान आंब्याची चव, त्याचा नैसर्गिक गोडवा आणि त्याच्याशी जोडलेली ग्रामीण संस्कृती याची सर कोणत्याही आधुनिक पर्यायाला येऊ शकत नाही. त्यामुळे गावरान आंब्यांची झाडे जपण्याची आणि ग्रामीण परंपरा टिकवून ठेवण्याची गरज आज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे.

## प्रा. विद्या देशमुख यांचा राज्यस्तरीय 'हिरकणी' पुरस्काराने सन्मान



**आरंभ मराठी । धाराशिव**

व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम आणि प्रवीण शिक्षण प्रसारक मंडळ, विजयनगर यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव येथील प्रा. विद्या देशमुख यांना राज्यस्तरीय 'हिरकणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामाजिक, साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. व्हॉइस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, महिला कार्याध्यक्ष वैशालीताई पाटील, सारथी समाचारचे संपादक संगम कोटलवार, प्राचार्य उमेश पाटील, सोनाली पाटील, विजयनगरचे सरपंच रमेश पाटील, आयुष्यमान भारतचे अध्यक्ष ओमप्रकाश शेटे, जे.जे. हॉस्पिटल मुंबईचे माजी उप-अधिष्ठाता डॉ. विनायकराव पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. येडशी येथे इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. विद्या देशमुख यांनी साहित्य क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे. त्यांचा "अर्थात" हा कवितासंग्रह तसेच "अनंत" हा चारोळी संग्रह प्रसिद्ध असून, त्यांच्या अनेक कविता व कथासंग्रहांना वाचकांची पसंती मिळाली आहे. त्या एक उत्तम गझलकार म्हणूनही ओळखल्या जातात. दैनिक वर्तमानपत्रे, दिवाळी अंक आणि आकाशवाणीच्या माध्यमातून त्यांनी सातत्याने साहित्य सेवा दिली आहे. प्रा. विद्या देशमुख यांना मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांच्या महाविद्यालयात तसेच परिसरातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# इंग्रजी माध्यमांच्या आकर्षणामुळे ग्रामीण शाळांचे अस्तित्व संकटात

## विद्यार्थी शोधण्यासाठी शिक्षकांची गावोगावी भटकंती; जिल्हा परिषद शाळांचा पट घसरला

आरंभ मराठी । धाराशिव

**ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळा, अनुदानित माध्यमिक विद्यालये आणि कनिष्ठ महाविद्यालयांसमोर विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकवण्याचे मोठे संकट उभे ठाकले असून, नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश मिळविण्याच्या उद्देशाने शिक्षकांना आता भर उन्हात गावोगावी फिरून विद्यार्थ्यांचा शोध घ्यावा लागत असल्याचे चित्र सध्या ग्रामीण भागात दिसून येत आहे. धाराशिव जिल्हा परिषदेने इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला असला तरी प्रत्यक्ष हे वर्ग सुरू होण्यास आणखी किती वेळ लागेल हे माहित नसल्याने शिक्षकांच्या सुट्ट्या विद्यार्थी गोळा करण्यात जात आहेत.**





एकेकाळी ग्रामीण शिक्षणाचा कणा मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व अनुदानित शाळांवर आता खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. 'मुलाला इंग्रजी माध्यमातच शिक्षण द्यायचे' या मानसिकतेमुळे अनेक पालक स्थानिक शाळांकडे पाठ फिरवत असून, जादा फी भरूनही १५ ते २० किलोमीटर अंतरावरील खासगी शाळांकडे धाव घेत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक मराठी माध्यमांच्या शाळांची अवस्था चिंताजनक बनली आहे. १ मे रोजी वार्षिक परीक्षेचे निकाल लागल्यानंतर अनेक शाळांनी प्रवेश मोहीम सुरू केली आहे. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने शिक्षकांना उन्हाळी सुट्ट्यांमध्येही गावोगावी जाऊन पालकांच्या भेटी घ्याव्या लागत आहेत. काही ठिकाणी शिक्षक घरपोच जाऊन पालकांना शाळेच्या सुविधा, डिजिटल शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि विविध उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विनंती करत आहेत. काही शिक्षक तर स्वतःच्या वाहनाने दुर्गम वाड्या-वस्त्यांवर जाऊन विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद साधत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, कोणत्या शाळेत शिक्षण चांगले मिळते?, इंग्रजीचे वातावरण कसे आहे?, सुविधा कोणत्या आहेत? याची चौकशी पालकांकडून केली जात असून, अनेक पालक खासगी इंग्रजी शाळांमध्ये प्रवेशासाठी दाखले काढत असल्याची माहिती समोर येत आहे. काही पालक मुलांच्या भवितव्यासाठी इंग्रजी माध्यम हाच एकमेव पर्याय असल्याचे मानत असल्याने ग्रामीण भागातील मराठी शाळांवरील विश्वास कमी होत चालल्याची खंत शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. काही शिक्षकांनी व्यक्त केलेल्या चिंतेनुसार, अनेक शाळांमध्ये पटावर विद्यार्थ्यांची संख्या असली तरी प्रत्यक्ष उपस्थिती अत्यंत कमी असते. विद्यार्थ्यांची ही गळती कायम राहिल्यास भविष्यात तुकड्या बंद होण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे शिक्षकांसमोर आता केवळ अध्यापनाचेच नव्हे, तर शाळेचे अस्तित्व टिकवण्याचेही मोठे आव्हान उभे राहिले आहे.जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजिटल शिक्षण, ई-लर्निंग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संगणक शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांसारख्या विविध सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. अनेक शिक्षक स्वतः पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र वाढत्या इंग्रजी माध्यमांच्या स्पर्धेत ग्रामीण शाळांना पालकांचा विश्वास जिंकण्यासाठी अधिक परिश्रम घ्यावे लागत असल्याचे वास्तव या निमित्ताने समोर आले आहे.

### विद्यार्थी गळतीमुळे तुकड्यांवर संकट

ग्रामीण भागातील अनेक अनुदानित व जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने घटत आहे. ही परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात काही शाळांच्या तुकड्या बंद होण्याची शक्यता शिक्षकांकडून व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी कमी पटसंख्येमुळे शिक्षक पदांवरही परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

### इंग्रजी माध्यमाचा वाढता प्रभाव

इंग्रजी माध्यमात शिक्षण घेतल्यास भवितव्य उज्ज्वल होईल, या मानसिकतेमुळे पालकांचा ओढा खासगी शाळांकडे वाढत आहे. अनेक पालक अधिक फी भरूनही मुलांना दूरच्या इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश देत आहेत. ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे जाळे वाढत असल्याने जिल्हा परिषद शाळांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

### जिल्हा परिषद शाळांचा पट घसरला

जिल्हा परिषद शाळांचा पट दरवर्षी घसरत चालला आहे. दरवर्षी जिल्हा परिषद शाळांमधील अडीच ते तीन हजार विद्यार्थी कमी होत असल्याचे चित्र समोर येत आहे. 'गुढीपाडवा प्रवेश वाढवा' सारखे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळांकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र तरीही विद्यार्थ्यांची आणि पालकांची मानसिकता बदलत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ग्रामीण शिक्षण व्यवस्थेसमोर भविष्यात आणखी गंभीर संकट उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सुट्टीतही शिक्षकांची प्रवेश मोहीम

उन्हाळी सुट्ट्या सुरू असतानाही शिक्षकांना गावोगावी जाऊन पालकांच्या भेटी घ्याव्या लागत आहेत. डिजिटल शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्यापन, ई-लर्निंग सुविधा, मोफत पाठ्यपुस्तके, पोषण आहार आणि विविध उपक्रमांची माहिती देत शिक्षक विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी प्रोत्साहित करत आहेत.

# शिराढोण येथे गोवंश कत्तल प्रकरण उघड; 8 जणांविरुद्ध गुन्हा दाखल, लाखोंचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी । शिराढोण

कळंब तालुक्यातील शिराढोण शिवारात गोवंश कत्तल प्रकरण उघडकीस आले असून शिराढोण पोलीस ठाण्यात 8 जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस शिपाई मुंजा शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ही कारवाई करण्यात आली. दिनांक 29 मे रोजी सकाळी शिराढोण शिवारातील शेत गट नं. 249 मधील मंजूर उस्मान कुरेशी यांच्या शेतातील गोठ्याच्या बाजूस पत्र्याच्या आडोशाला गोवंश कत्तल सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता आरोपी गोवंश कत्तल करताना आढळून आले. या प्रकरणी मंजूर उस्मान कुरेशी, अयुब इसाक कुरेशी, खय्युम अयुब कुरेशी, सिकंदर गुलाममैदुद्दीन कुरेशी, सिद्दीक हमीद कुरेशी, मुख्तार उस्मान कुरेशी, युनूस पाशा कुरेशी व मुस्तफा उर्फ बबलू नसीर शेख (सर्व रा. शिराढोण ता. कळंब) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असता गोठ्यामध्ये 5 गोवंश जातीचे बैल बांधून ठेवलेले आढळले. त्यांना चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याचेही निदर्शनास आले. तसेच गोवंश कत्तलीसाठी वापरण्यात येणारे साहित्य, वाहने आणि इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये 5 गोवंश बैल, एक पिकअप वाहन,धारदार कुऱ्हाडी, सत्तूर, चाकू आदी साहित्याचा समावेश असून एकूण अंदाजे 8,61,150 किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईत एक पांढऱ्या रंगाचे पिकअप वाहन होंडा युनिकॉर्न, हिरो डिलक्स, हिरो स्प्लेंडर, हिरो फॅशन आदी मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. तसेच गोवंश कत्तलीसाठी वापरली जाणारी लोखंडी कुऱ्हाड, धारदार सत्तूर व चाकू देखील ताब्यात घेण्यात आले. ही धडक कारवाई शिराढोण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धारणीधर कोळेकर व त्यांच्या पथकाने केली. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून अवैध गोवंश कत्तलीविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे दिसून आले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम 325, प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम 1960 चे कलम 11(1)(ज) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 चे कलम 5(ब)(क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

# पनवेल अधिवेशनासाठी शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : आमदार प्रवीण स्वामी

## राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची उमरग्यात आढावा बैठक

आरंभ मराठी । उमरगा



उमरगा येथील शांताई मंगल कार्यालयात बुधवारी (दि.२७) 'राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य' संघटनेची विविध पदाधिकारी निवड व आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत आगामी ५ जून रोजी पनवेल (जि. रायगड) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार सोहळ्यास शिक्षकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी केले. बैठकीत ओबीसी व बहुजन शिक्षकांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा कमी करण्यासाठी तसेच वेतन, भत्ते व इतर प्रलंबित मागण्यांसाठी एकजुटीने लढा उभारण्याची गरज व्यक्त करण्यात आली. संघटना अधिक मजबूत करण्यासाठी विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडीही यावेळी जाहीर करण्यात आल्या. बैठकीत जिल्हा परिषद उपाध्यक्ष संजय खंडाळकर, जिल्हा चिटणीस विक्रम पाचंगे, जिल्हा सहसचिव सुधाकर आतकरे, जिल्हा कार्याध्यक्ष परमेश्वर साखरे यांची निवड करण्यात आली. महिला तालुका कार्यकारिणीत अरुणा वाघे, सुनिता पोतदार, अनिता माने, सुवर्णा जगताप, शशिकला राठोड, पुष्पलता पांढरे, धनश्री दळवी, वर्षाराणी पाटील, ऊर्मिला मुसळे, प्रीती काळे, सुनिता पटवारी व भाग्यश्री पंडीत यांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच जिल्हा परिषद शिक्षक तालुका कार्यकारिणीत व्यंकट क्षिरसागर, विजयकुमार घोडके, गोविंद कुंभार, शाहुराज हुलगे, माधव धुळे, महादेव आहेरकर, विनायक चव्हाण, अनंत लोखंडे, राम जमादार, रमेश दुधभाते, दत्ता पाटील व वैभव पटवारी यांची निवड करण्यात आली. खाजगी अनुदानित व स्वयंअर्थसहायित शिक्षक तालुका कार्यकारिणीत प्रा. परमेश्वर सूर्यवंशी, मनोजकुमार गुरव, किशोर पांचाळ, प्रा. मारुती खमितकर, महेश खंडाळकर, दयानंद साखरे, विजय सगर, इरप्पा पोतदार, राजेंद्र पटवारी, लक्ष्मण देवकर, विजयकुमार घोडके व प्रदीपकुमार सगर यांची निवड करून मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. बैठकीस लातूरचे गोविंद सगर, कांचन स्वामी, हिंगोलीचे लहू राक्षे, अरुणा गुणाले यांच्यासह धाराशिव व इतर जिल्ह्यांतील अनेक शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी देविदास बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. परमेश्वर सूर्यवंशी व प्रा. विजय सगर यांनी केले, तर आभार जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रकल्याणकारी 'पसायदान'ने करण्यात आली.

आरंभ मराठी

## वाढत्या खर्चामुळे बळीराजा चिंतेत

# तेर आणि परिसरात खरीपपूर्व मशागतीला वेग

### शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा

आरंभ मराठी । तेर



पावसाळा तोंडावर आल्याने तेर व परिसरातील शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीला लागले असून तेरणाकाठी पेरणीपूर्व मशागतीच्या कामांना वेग आला आहे. कडक उन्हाची पर्वा न करता शेतकरी शेतात राबताना दिसत असून बैलजोडी तसेच ट्रॅक्टरच्या सहाय्याने मशागत सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण भागात सध्या शेतीकामांची लगबग वाढली आहे. यंदा रब्बी हंगाम उशिरापर्यंत सुरू राहिल्याने खरीप हंगामाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना कमी वेळ मिळाला आहे. त्यामुळे वेळेत मशागत करून जमीन पेरणीयोग्य बनविण्यासाठी शेतकरी धावपळ करत आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे बैल उपलब्ध आहेत ते पंजी, पाळी, कुळवणी आदी पारंपरिक मशागतीची कामे करत आहेत, तर अनेकांनी ट्रॅक्टरचा पर्याय स्वीकारला आहे. मात्र, वाढत्या डिझेल दरांचा फटका थेट शेती मशागतीवर बसत आहे. डिझेल महागल्यामुळे ट्रॅक्टर चालकांनी मशागतीचे दर एकरी शंभर रुपयांनी वाढविल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. आधीच गतवर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले होते. काढणीच्या काळात झालेल्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे उत्पादन घटले आणि त्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला होता. यंदाच्या खरीप हंगामापूर्वी पीकविम्याची मदत मिळेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र विमा कंपन्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे अनेकांना विमा मिळणे कठीण झाल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे नव्या हंगामासाठी लागणारा खर्च उचलताना शेतकरी चिंतेत आहेत. तेर परिसरात सोयाबीन हे मुख्य खरीप पीक मानले जाते. बहुतांश शेतकरी सोयाबीनची पेरणी करतात. त्याखालोखाल मुग व उडीद या पिकांना प्राधान्य दिले जाते. मात्र बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे तसेच मशागतीचे वाढलेले दर यामुळे शेतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. याशिवाय मजुरांची टंचाईही शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. शेतीची कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक असताना मजूर सहज उपलब्ध होत नसल्याने अनेकांना अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. त्यामुळे खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच बळीराजा आर्थिक अडचणींच्या विळख्यात सापडल्याचे चित्र तेर परिसरात दिसून येत आहे.

# तुळजापुरात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात; नगराध्यक्ष विनोद गंगणे यांची प्रमुख उपस्थिती

आरंभ मराठी । तुळजापूर



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त तुळजापूर येथील सावरकर चौकात अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास नगराध्यक्ष विनोद गंगणे व विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. "स्वातंत्र्यवीर सावरकर अमर रहे", "स्वातंत्र्यवीर सावरकरांचा विजय असो" अशा घोषणांनी सावरकर चौक दणाणून गेला. सावरकर विचार मंच, तुळजापूर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी शहरवासीयांना शुभेच्छा दिल्या. विरोधी पक्षनेते अमोल कुतवळ यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा गौरव करत देशभक्ती व राष्ट्रनिष्ठेचे विचार त्यांनी समाजात रुजविल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सावरकर विचार मंचाचे अध्यक्ष बाळासाहेब शामराज यांनी केले. यावेळी नगरसेवक सागर कदम, नरेश अमृतराव, उमेश गवते, महेश गरड, सचिन अमृतराव, महेश कुलकर्णी, शांताराम पेंदे, संस्कार भारतीचे डॉ. सतीश महामुनी, पद्माकर मोकाशे, प्रफुल्लकुमार शेटे, पत्रकार अंबादास पोफळे, अजय साळुंखे, अनंत बुरांडे, आप्पा रसाळ, सागर पारडे, महेंद्र कावरे, दीपक त्रिकोणे, हरिभाऊ पाठक, शशिकांत जोशी, गोपाळ चाटुफळे, विठ्ठल सोनवणे, उमेश कदम, रोहन शेटे, अमित कदम आदी उपस्थित होते. या निमित्ताने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पूजनावेळी मंगल ध्वनीही वाजविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उमेश गवते, महेश कुलकर्णी व महेश गरड यांनी विशेष परिश्रम घेतले.

आरंभ मराठी